ISSN No 2347-7075
Impact Factor- 7.328
Volume-2 Issue-7

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

Young Researcher Association

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.7 Mar - Apr 2022

# जागतिकीकरणाचा महानगरीय कवितेवरील प्रभाव

प्रा.अंकुश भारत घुले
सहाय्यक प्राध्यापक,राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज,कोल्हापूर

**प्रस्तावना :**

वाङ्मयप्रकारातील एक सशक्त प्रकार म्हणून कवितेकडे पहिले जाते. मराठी कवितेची परंपरा प्रदीर्घ स्वरूपाची राहिलेली आहे. जवळजवळ सातशे वर्षांची परंपरा या मराठी कवितेला लाभलेली आहे. या सातशे वर्षाच्या वाटचालीत तिने आपले स्वतंत्र रूप सतत सिद्ध केले आहे. कधी समाजप्रबोधन तर कधी निखळ मनोरंजन असे या कवितेचे स्वरूप राहिलेले आहे. प्राचीन काळापासून ओवीबध्द असलेली गेय कविता अलीकडे मुक्तछंदाकडे वळालेली दिसते. आताच्या कवितेला कोणतीही बंधने नाहीत. त्याचे मुख्य कारण आधुनिक कालखंडात इंग्रजीच्या संपर्काने हे सर्व बदल मराठी कवितेत झालेले आपणास दिसून येतात. कविता म्हणून जे कवितेला एक पद्य स्वरूप होते त्यातून आता आधुनिक कविता बाहेर पडलेली आहे. म्हणजेच ती पद्याऐवजी गद्याकडे अधिक झुकलेली दिसते. मराठी कवितेच्या क्षेत्रातील नामवंत कवी केशवसुत, बालकवी, मर्ढेकर, कोल्हटकरांची कविता वेगळ्या धाटणीची ठरली. याच परंपरेला विरोध करीत तर कधी संवादी राहत आधुनिक कवींनी आपली स्वतंत्र कविता निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रामुख्याने कवितेचा अभ्यास करत असताना विशिष्ट कालखंड नजरेसमोर ठेऊन करावा लागतो. कारण त्या विशिष्ट कालखंडात घडलेल्या घटना घडामोडींचा त्या कवितेवर प्रभाव पडत असतो. अशाच प्रकारे नव्वदोत्तर कालखंड ही संज्ञा मराठीमध्ये रूढ झालेली आहे. नव्वदोत्तर म्हणजे १९९० नंतरचा जागतिकीकरणाचा कालखंड होय. या जागतिकीकरणाचा प्रभाव शहरापासून ते गावापर्यंत सर्वत्र झालेला आपणास दिसून येतो. गावे ओस पडू लागली तर महानगराच्या ठिकाणची लोकसंख्या झपाट्याने वाढू लागली. याच मुख्य कारण म्हणजे रोजगार होय. रोजगारासाठी लोकांचे स्थलांतर होऊ लागले. जागतिकीकरणाने शहरांच्या ठिकाणी रोजगार मिळू लागले. जरी शहरांच्या ठिकाणी रोजगार मिळत असले तरी त्यातून अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले. म्हणजेच जागतिकीकरणाचा जसा चांगला परिणाम येथील जीवन व्यवस्थेवर झाला, तसाच वाईट परिणाम ही झाला. यासाठी जागतिकीकरणाची संकल्पना समजावून घेणे आवश्यक आहे.

**जागतिकीकरणाची संकल्पना :**

१९९० च्या सुमारास जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. 'जागतिकीकरण म्हणजे संपूर्ण जगाचे एका मोठ्या बाजारपेठेत रूपांतरण होणे.' त्याचबरोबर विविध देशातील खुले आर्थिक व व्यापारी धोरणांचा स्वीकार करणे म्हणजेच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी होणे. त्यामुळे या जागतिकीकरणाचा सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर याचा फार मोठा परिणाम झाला आहे. 'ग्लोबल व्हिलेज' ही संकल्पना जागतिकीकरणातूनच उदयास आली आहे. जागतिकीकरणाच्या बरोबर खाजगीकरण व उदारीकरण असे प्रवाह सुरु झाले. यालाच 'खा.ऊ.जा' असे संबोधले जाऊ लागले. या 'खा.ऊ.जा' थेट परिणाम महानगरीय जीवनावर झपाट्याने झाला. त्याचे मुख्य कारण जागतिकीकरणाची मुख्य केंद्र हे सुरुवातीला महानगरे होती. त्यानंतर मात्र हळूहळू त्याचा परिणाम हा गाव-खेड्यांपर्यंत पोहचला. म्हणून जागतिकीकरणाचा पहिला प्रभाव हा महानगरावर पडलेला आपणास दिसून येतो. जागतिकीकरणाच्या अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे;

1. एडवर्ड हार्मन :- "जागतिकीकरण ही सीमापार उत्पादने, भांडवल सेवा आणि आर्थिक क्रिया प्रक्रियांच्या वाढत्या प्रवाहाला लक्ष करणारी प्रक्रिया होय."
2. बायलिस आणि स्मिथ :- "जगाच्या विविध भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या लोकांमध्ये वाढते सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, व्यापारी, सांस्कृतिक संबंध दर्शविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय."
3. जागतिक बँक :- "जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणे होय."

जागतिकीकरणाबरोबरच खाजगीकरण आणि उदारीकरण ही आपणाला समजून घ्यावे लागेल.

**खाजगीकरण :**

१९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर नवीन आर्थिक धोरणातील एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे "खाजगीकरण" होय. सर्वसाधारणपणे खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग खाजगी क्षेत्रातील व्यक्तीकडे हस्तांतरित करणे होय. खाजगीकरणाच्या अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे;

1. डी.आर.पेंडसे : "खाजगीकरण म्हणजे राष्ट्रीय आर्थिक व्यवहारातील सरकारचा सहभाग कमी करणे होय."
2. डेव्हीड हेरॉल्ट :- "खाजगीकरण म्हणजे साधनसामग्रीच्या उपयोगासाठी बाजाराविरहीत पद्धतीऐवजी बाजारधिष्ठीत पद्धतीचा स्वीकार करण्याची प्रक्रिया."

वरील दोन अभ्यासकांच्या व्याख्यावरून आपणास असे म्हणता येईल की, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची मालकी खाजगी उद्योगाकडे हस्तांतरित करणे होय.

**उदारीकरण :**

१९९१च्या नव्या आर्थिक धोरणातील तरतुदीनुसार 'खा.ऊ.जा' मधील तिसरी महत्त्वाची संकल्पना होय. उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेवर असणारे सरकारचे निर्बंध व नियंत्रण कमी करणे होय. उदारीकरणाच्या अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे;

1. डॉ.व्ही.एम.अत्री :- "आर्थिक उदारीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की जिच्यामुळे निर्यातीस आणि आयातीस प्रतिबंध करणाऱ्या घटकांची तीव्रता कमी करण्यासाठी बाजाराधिष्टीत किंमतयंत्रणेचा स्वीकार केला जातो."

2. आर्थिक उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेवरील सरकारी नियंत्रण शिथिल करणे. तसेच खुल्या आर्थिक धोरणांचा अवलंब करणे म्हणजेच उदारीकरण होय.

प्रस्तुत जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण यामुळे सर्वसामान्य माणसाचे जीवन बदलून गेले. १९९० नंतर याचा प्रभाव येथील जीवन व्यवस्थेवर झाला. यामुळे गरीब आणि श्रीमंत अशी दरी निर्माण झाली. गरीब अधिक गरीब होऊ लागला. तर श्रीमंत हा अधिक श्रीमंत होऊ लागला. त्यामुळे गरीबाचा भारत आणि श्रीमताचा इंडिया असे लोक म्हणू लागले. जागतिकीकरणाचा पहिला प्रभाव हा येथील महानगरीय जीवनावर झालेला आपणास दिसून येतो. खुल्या अर्थ व्यवस्थेमुळे व्यापार, उद्योगांना चालना मिळाली. रोजगारांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर झाली. परिणामी खेडी ओस पडू लागली. प्रत्येकजण नोकरीसाठी शहराकडे धाव घेऊ लागला. शहरांची लोकसंख्या वाढत गेली. झोपडपट्ट्याचे प्रमाण भरमसाठ वाढले. या सर्वाचा परिणाम येथील लोकांच्या जीवनावर झाला. महानगराच्या ठिकाणची वाढत चाललेली गुन्हेगारी, बेकारी यामुळे महानगरे बकाल होऊ लागली. या सर्वांचे प्रतिबिंब मराठी महानगरीय कवितेत आपणास पहावयास मिळते. १९९० नंतर अनेक महानगरीय कवी आपल्या कवितेच्या माध्यमातून जागतिकीकरणावर भाष्य केले आहे.

**महानगरीय कवी:**

जागतिकीकरणानंतर अनेक महानगरीय कवी काव्यलेखन करू लागले. या कवितेतून महानगरीय जीवन, तंत्रज्ञानाची प्रगती, माणसांचे यंत्रवत होत जाणे, वाढती लोकसंख्या व बेरोजगारी, मेट्रो पॉलिसिज, माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेला प्रचंड विस्फोट, लोकांना जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष, लोकांची हरवलेली संवेदनशीलता, भाषिक संक्रमण, जाहिरातबाजी इ. विषय घेऊन महानगरीय कविता येताना दिसते. यामध्ये महानगरीय कवी हेमंत दिवटे, श्रीधर तिळवे, सचिन केतकर, मन्या जोशी, वर्जेश सोलंकी, संजीव खांडेकर मंगेश काळे, अरुण काळे अशी नावे प्रातिनिधिक स्वरुपात सांगता येतील. याबरोबरच इतर अनेक महानगरीय कवींनी जागतिकीकरणाच्या प्रभावातून कविता लेखन केले आहे.

**महानगरीय कविता :**

१९९० नंतर जागतिकीकरणाचा फार मोठा प्रभाव येथील जीवन व्यवस्थेवर झाला. यामुळे येथील सामान्य लोकांचे जीवन ढवळून निघाले. सुरुवातीच्या काळात या जागतिकीकरणाचा केंद्रबिंदू ही महानगरे असल्याचे आपणास दिसून येते. कारण जागतिकीकरणाचा पहिला प्रभाव महानगरावर पडला. त्यामुळे जागतिकीकरणाचा फार मोठा प्रभाव हा १९९० नंतरच्या महानगरीय कवितेवर पडलेला आपणास पहावयास मिळतो. या विषयी दा.गो.काळे म्हणतात. "नव्वदोत्तरी कवितेचा विचार करताना 'खाऊजा' संस्कृतीच्या पहिल्या जाणिवेचा संवेदनांचा हुंकार महानगरीय कवितेतून पहावयास मिळतो. या जागतिकीकरणाच्या विचारव्युहाला, भावविश्वाला शब्दरूप देण्याचे कार्य महानगरीय कवितेने केले आहे. माणसांच्या बाजारशरण मानसिकतेला अभिव्यक्तीच्या पातळीवर आणून माणसांच वस्तूकरण होण्याचा काळ चित्रित झाला आहे. हे नाकारता येत नाही. आता तर संपूर्णपणे रुजलेल्या या संस्कृतीची सूक्ष्मतेच्या स्तरावर होणारी चिकित्सा कवितेतून येते आहे." ('नव्वदोत्तरी नागर कविता', 'सर्वधारा' मार्च – २०१७) यावरून आपणास असे म्हणता येईल की, जागतिकीकरणाचे जे बरे-वाईट परिणाम महानगरावर झाले याचे स्पष्ट प्रतिबिंब या कवितेवर उमटले आहे. कवी हेमंत दिवटे हे जागतिकीकरणातून आलेल्या विफलतेचे वर्णन करताना म्हणतात,

"सारं जग जवळ आलय म्हणतात
पण माणसं माणसांपासून दूर धावताहेत,
रोबोटच्या गळ्यात गळा घालताहेत,
माणसांऐवजी कुत्र्यांवर, कुत्र्यांऐवजी यंत्रांवर विश्वास टाकताहेत."

जागतिकीकरणामुळे सार जग जवळ आले आहे परंतु माणूस माणसापासून तुटत चालल्याची भावना याठिकाणी कवी हेमंत दिवटे व्यक्त करतात. जागतिकीकरणाच्या या युगात जीवंत माणसाऐवजी रोबोटच्या गळ्यात पडत आहेत. माणसं माणसांच्या ऐवजी कुत्र्यावर आणि कुत्र्याऐवजी यंत्रावर अधिक विश्वास ठेवत आहेत. असे कवी म्हणतात. या कवितेच्या माध्यमातून कवींनी आपली परखड भूमिका मांडली आहे. अशाच आशयाची संजीव खांडेकरांची कविता ही जागतिकीकरणाचे चित्रण करणारी आहे. संजीव खांडेकर आपल्या कवितेत लिहितात,

"आणि उद्याला जिथे जायचे
तिथेच आता आधी पोचलो
हिरवे बुंधे मुळे खोलही
आणि ओंडका वाट पाहतो
गतशतकांचे सगळे टिंबर
ढीग उशाला, मिटले डोळे
बेंबी मधून तरी उगवले
कमळ गुलाबी हेलिकॉप्टर"

प्रस्तुत ओळीतून खांडेकर यांनी जागतिकीकरणामुळे झालेला बदल अचूक शब्दात मांडला आहे. लोकांचे जीवन कसे यंत्रवत झाले आहे हे त्यांनी अचूकपणे मांडले आहे. कवी म्हणतात की, गतशतकाच्या वैभवशाली इतिहासाचे ढीग उशाला आहेत. परंतु जागतिकरणामुळे नवीन जगाची निर्मिती होत आहे. सगळे यंत्रवत होत आहे. त्यामुळे माणसांची किंमत कमी होत आहे. अशा प्रकारच्या भावना कवी संजीव खांडेकरांनी व्यक्त केल्या आहेत. नव्वदोत्तर कवितेत जागतिकीकरणातून आलेल्या जाणिवा प्रकट झालेल्या आहेत. यामध्ये भाषाविषयक जाणिवा, लैंगिक जाणिवा, अस्तित्ववादी जाणिवा अतिशय प्रखरपणे येताना दिसतात. यांत्रिकीकरणाच्या युगात माणूस स्वतःला हारवत चालला आहे. त्याला स्वतःचे भान

राहिलेले नाही. अशा अवस्थेत तो यंत्रासारखा वावरत आहे. त्याचे जीवन यंत्रासारखे साचेबध्द झालेले आहे. या सर्वांचे चित्रण १९९० नंतरच्या कवितेत येताना दिसते. माणूसपण हारवत चाललेल्या या कालखंडात आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न प्रत्येकजण करीत असतो.

कवी उत्तम अंभोरे हे 'थांबताच येत नाही : इदर टू फ्लीट ऑर फाईट' या लेखात नव्वदोत्तर महानगरीय कवितेविषयी लिहितात, "शहरीकरणातून येणारे आत्यंतिक यांत्रिकीकरण, यांत्रिकीकरणातून उभा राहणारा पैसा, भांडवली बाजारातून येणाऱ्या ब्रॅण्डेडवस्तू या वस्तूला दिली गेलेली प्रतिष्ठा आणि या प्रतिष्ठेपायी हारवत चाललेली माणुसकी हे भारतीय महानगरांमधील वास्तव आहे. भांडवली बाजाराने विविध वस्तूला दिलेल्या ब्रॅण्डनेममुळे यातून एक वेगळाच वर्ग उभा राहिला आहे. यात वस्तू आणि वर्ग फरक करणे दुरापास्त होऊन बसले."

जागतिकीकरणाने क्रांती झाली. तंत्रज्ञानाचा विकास झाला. आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळाली. यातून छोटे व्यापारी, उद्योग भरडून निघाले. बहुराष्ट्रीय कंपन्या आणि भांडवलदार यांचा धंदा तेजीत होऊ लागला.चंगळवादी संस्कृतीचा उदय झाला. महानगराच्या ठिकाणी सतत होत असलेली आंदोलने, जाळपोळ, लुटालूट यामुळे सर्वसामान्य माणसाला एक प्रकारची असुरक्षितता वाटू लागली. महानगरांच्या ठिकाणची गर्दी देखील भीतीच सावट निर्माण करते. अशा प्रकारची भावना कवी वर्जेश सोळंकी त्यांच्या कवितेतून प्रकट होताना दिसते. ते म्हणतात,

"तुम्ही घाबरून बंद केलेला असेल घरचा दरवाजा
बाहेर फाटलेली असेल दहशतीने शहराची त्वचा
शहर लोंबकळत असेल विजेच्या
तारांवर कावळा होऊन
तुमच्या दिशेने भरधाव येत असेल
एखाद जळक टायर"

आज महानगरच्या ठिकाणी कोणीही सुरक्षित नाही. येथील जनतेला दररोज नवनवीन संकटाना सामोरे जावे लागत आहे. याठिकाणी कधी काही अघटीत घडेल काही सांगता येत नाही. कवी वर्जेश सोळंकी यांनी या कवितेच्या माध्यमातून महानगरीय जीवनाचे वास्तव मांडलेले आहे.

**समारोप :**

जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यामुळे साहित्यातून त्यावर भाष्य येणे साहजिकच आहे. कारण समाजात घडणाऱ्या ठळक घटना-घडामोडीची दखल साहित्य घेत असते. त्या-त्या काळातील साहित्यावर त्या घटना-घडामोडीचा प्रभाव आपणास जाणवत असतो. जागतिकीकरणाचा देखील फार मोठा प्रभाव येथील जीवन व्यवस्थेवर झाला आहे. याची दखल साहित्याने घेतली आहे. मराठी साहित्यातील महानगरीय कवितेत देखील जागतिकीकरणाचे चित्रण आले आहे. यावरून आपणास असे म्हणता येईल की, १९९० नंतरच्या मराठी महानगरीय कवितेवर जागतिकीकरणाचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो.

**संदर्भ :**


1. शोभणे रवींद्र (संपा) : जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, २००९
2. डॉ. रमेश वरखेडे, जागतिकीकरण आणि मराठी
3. सर्वधारा (अंक) : 'नव्वदोत्तर नागर कविता' दा. गो. काळे मार्च २०१७
4. अतिरिक्त (अंक) : संपादक. दा. गो. काळे, दिनकर मनवर मार्च २०१३

| | | |
|---|---|---|
| ९६ | जागतिकीकरण आणि स्त्रीवादी साहित्य प्रवाह<br>प्रा. श्रीमती वंदना शामराव खोराटे | 256-258 |
| ९७ | जागतिकीकरणाचा महानगरीय कवितेवरील प्रभाव<br>प्रा.अंकुश भारत घुले | 259-261 |
| ९८ | जागतिकीकरणाचा वेध घेणारी कादंबरी : आडगुळ आख्यान<br>प्रा. सौ. व्हसमने सुरेखा बसाप्पा | 262-264 |
| ९९ | जागतिकीकरणानंतरची दलित कविता<br>प्रा.डॉ. राजश्री बंडोपंत पोवार | 265-268 |
| 100 | जागतिकीकरणावर मराठी दलित कवितेचा प्रभाव<br>प्रा. श्रीरंग अरविंद तराळ | 269-272 |
| 101 | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी<br>प्रा. मोहन बाबूराव चव्हाण | 273-275 |
| 102 | जागतिकीकरण आणि मराठी नाटक<br>अमर शामराव सकटे | 276-278 |
| 103 | समकालीन पर्यावरण आणि १९९० नंतरचे मराठी नाटक<br>प्रा.स्मिता कोंडिबा कालभूषण | 279-281 |